**उलटतपास प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री. एम. वाय. घायले यांच्यामार्फत शपथेवर सुरु :**

१. दावा मिळकत गट क्र. ०१ आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत गट क्र. ०१ मध्ये घर मिळकत ४३ असल्याबाबत दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ०१ मध्ये प्रतिवादीच्या घरासोबत बाजुला मोरेश्वर लक्ष्मण भोईर, जयराम काशिनाथ भोईर, सहादेव लक्ष्मण भोईर व गोविंद सखाराम भोईर यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, या सगळ्यांच्या घराच्या पश्चिमेला लागुन कुंपन आहे. पुर्वेला देखील कुंपन आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी व त्याच्या घराला लागुन असलेल्या उपरोक्त लोकांच्या घराच्या पश्चिमेला असलेल्या कुंपन व त्यांच्या घरामध्ये मोकळी जागा आहे.

**प्रश्नः** प्रतिवादी व उपरोक्त सर्व लोकांच्या घराच्या पुर्वेला असलेली घरासमोरची मोकळी जागा ते सर्वजण वापरतात?

**उत्तरः** होय, ते सर्वजण आता वापरतात, परंतु आम्हाला जायला–यायला देखील तिच वाट आहे.

हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी व उपरोक्त सर्व लोक ती मोकळी जागा पुर्वीपासुन वापरतात. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी व उपरोक्त सर्व लोकांच्या त्या मोकळ्या जागेच्या वापराला वादीने केव्हाही हरकत घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादी माझे मामा असल्यामुळे त्यांना मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने मोकळ्या जागेत कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम केले नाही.

उलटपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE

Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2025.10.29 18:33:55 +1100

स्थळ : रोहा. (एस.व्ही. खैरे)

दि. २९.१०.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.